नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/१०/२०२६ (गुरूवार )**

---

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी यांचा सत्कार समारंभ

दिनांक ३०/०९/२०२६ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी याचा सत्कार समारंभ नियोजीत करण्यात आला होता.

सदर समारंभात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. श्रेणी पोउपनि श्री ज्ञानेश्वर कवडुजी राऊत, नेमणूक पोस्टे एमआयडीसी बोरी, नागपुर ग्रामीण जिल्हा, २. श्रेणी पोउपनि श्री रविंद्र यादवराव बकाल, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांनी सेवानिवृत्त अधिकारी यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमात मानव संसाधन शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. प्रतापराव भोसले व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस

# एटीएम कार्ड अदला—बदली करून आर्थिक फसवणूक करणारा अज्ञात आरोपी निष्पन्न करून आरोपीला केले अटक

# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात पथकाने पोलीस ठाणे रामटेक येथे दाखल असलेल्या ए एटीएम कार्ड अदला—बदली करून आर्थिक फसवणूक केल्याच्या गुन्ह्याची उकल केली आहे. आरोपीस अटक करून फसवणुकीच्या रकमेसह ३४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक २०/०८/२०२६ रोजी सदर गुन्हयातील फिर्यादी हे किसान चौक, रामटेक येथील एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी एटीएममध्ये उपस्थित असलेल्या आरोपीने मदत करण्याच्या बहाण्याने फिर्यादीचे एटीएम कार्ड घेतले व दुसरे कार्ड त्यांना परत दिले. त्यानंतर फिर्यादीच्या खात्यातून एकूण २४,०००/— रक्कम परस्पर काढण्यात आली. काही वेळाने फिर्यादीस आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३१८(४) व ३१९(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सदर गुह्याचा समांतर तपास करीत असतांना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे शोध घेतला असता सदर गुन्हयात आरोपी **नामे मोहम्मद आमिर मोहम्मद बशीर, वय ४४ वर्ष, रा. बाबरी, शामली, उत्तर प्रदेश याचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले.** दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सदर गुन्ह्यातील आरोपीला नागपूर येथून ताब्यात घेतले.त्याच्या कडे सदर गुन्हयाबाबत कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने पोलीस स्टेशन रामटेक परिसरात फसवणुकीचा गुन्हा केल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीचे ताब्यातून १) गुन्ह्यातील फसवणुकीची रोख रक्कम २४,०००/—रूपये तसेच एक अँड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकूण असा एकूण ३४,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपीस अटक करण्यात आले आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणारे २ आरोपी अटक
## ४२१ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुसह ९ लाख ७२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## सावनेर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन सावनेर :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सावनेर पोलीसांनी प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई करून गुन्हा नोंद केला आहे. सदर प्रकरणी २ अरोपींना अटक केले आहे**

सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच सावनेर पोलीसांनी मौजा अबिका चौक येथे नाकाबंदी करत कारवाई केली असता **आरोपी १) रवि शिकुमार शाहु, वय ३३वर्ष, रा. मानेवाडा नागपुर २) आकाश नरेश सोमकुवर, वय ३४ वर्ष, रा. रामबाग नागपुर** हे स्कार्पिओ वाहन क्र. एम एच—४०/ ए आर.—३२४८ सह मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्यांचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ४२१ किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ४,७२,५५७/— रूपये व** स्कार्पिओ वाहन क्र. एम एच—४०/ए आर.—३२४८ **किंमती ५,००,०००/—रूपये, असा एकुण ९,७२,५५७/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपी यांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक केली आहे. **आरोपीतां**विरूद्ध पोस्टे सावनेर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २८ लाख ९३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ३०/०९/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कालभैरव देवस्थान परीसरात खुल्याजागी सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा कालभैरव देवस्थान परीसरात खुल्याजागी सार्वजनिक ठिकाणी पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) शंकर कैलास सूर्यवंशी, वय ४९ वर्ष, रा. धम्मदीप नगर विटभट्टा चौक, प्लाट न. ०१ नागपूर २) पंकज सुरेश हारोडे, वय ४० वर्ष, रा. आनंद नगर बिनाकी मंगळवारी, कांजी हाऊस प्लाट नं. ११७३ नागपूर, ३) प्रकाश गणपत कूकडे, वय ४० वर्ष, रा. प्लॉट नं. २०१ यादवनगर कामठी रोड, नागपूर ४) हितेश नारायण चंद्रवंशी, वय ४२ वर्ष, बिनाकी मंगळवारी कांझी हाऊस, प्लॉट नं. १४७३ नागपूर ५) क्षितिज अशोक बंजारी, वय ४७ वर्ष, प्लॉट क्र. ११७२, आनंद नगर, बिनाकी मंगळवार कांजी हाऊस नागपूर यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम ५०,०००/—रूपये, वेगवेगळे कंपनीचे अँड्रॉईड ०५ मोबाईल किमंती ६३,०००/— रूपये ०४) वेगवेगळया कंपनीची ०४ दुचाकी वाहने व ०३ चारचाकी वाहने अशी एकुण ०७ वाहने किमंती २७,८०,०००/— असा एकूण किमंती २८,९३,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ५१,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०१/१०/२०२६ मौदा पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ शिवाजी चौक येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान हिरो होंडा मोटरसायकल क्र. एम एच—४०/एए—१५४२ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्याचेकडील पांढऱ्या पिशवीत देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे कमलेशकुमार मोतीलाल गुरजर, वय २३ वर्ष, रा. राजस्थानी धाबा, मौदा हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २० निपा किंमती १५००/—रूपये २) हिरो होंडा मोटरसायकल क्र. एम एच—४०/ए ए—१५४२ किंमती ४०,०००/—रूपये, ३) ०१ विवो कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल असा एकुण किंमती ५१,५००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी याचेविरूद्ध कलम ६५(अ), (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८९,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त, काटोल पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक ३०/०९/२०२६ काटोल पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ खंडाळा फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान मोपेड मोटार सायकल क्र. एम एच— ३१/एफ एन— ५१४८ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता विदेशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे राजकुमार रामदास तायडे, वय २८ वर्ष, रा. तिनखेडा, ता. काटोल, जि. नागपूर हा अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारूच्या ४५ निपा किंमती ९,७५०/—रूपये २) मोपेड मोटार सायकल क्र. एम एच— ३१/एफ एन— ५१४८ किंमती ८०,०००/—रूपये, असा एकुण किंमती ८९,७५०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी याचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०४ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३०/०९/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी रोहन कमलेश सिंग, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. १४, हुडको कालोनी ता. कळमेश्वर हा शिवाजी ग्राउंड ,हुडको कालोनी कळमेश्वर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी १) योगेंद्र उर्फ शुभम मनोहर आमले, वय २४ वर्ष, रा. थाटुरवाडा, ता. नरखेड, जि. नागपूर हा गोल बाजार काटोल येथे तसेच २) आकाश चंदुजी रहाटे, वय २८ वर्ष, रा. पॉवर हाउस जवळ काटोल हा थुल ले आउट काटोल सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. आरोपी ३) तनुजी राजुजी पातालबंस, वय २४ वर्ष, रा. फुले ले आउट पावर हाउस काटोल, जि. नागपूर हा तळयाची पार दत्त मंदीर काटोल येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

# अवैध दारू निर्मिती, विक्री आणि वाहतूक, सेवन करणाऱ्यांवर २६ गुन्हे दाखल, ०१ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ३०/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण २६ गुन्हे दाखल केले.

**पोलीस स्टेशन रामटेक** येथे ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०८ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बेला** येथे ०२ गुन्हे नोंद.

नमुद कारवाईत एकुण ७७४० मिली देशी दारू, ८१०० मिली विदेशी दारू, ८१ लिटर मोहाफुल दारू, ०१ मोसा असा एकुण १,०१०५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर